# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 07 October 2024
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
## **प्रादेशिक बातम्या**
## **दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची रक्कम टप्प्याटप्प्याने वाढवणार, मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- बळीराजा मोफत वीज योजनेला सुरुवात
- नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची आज नवी दिल्लीत बैठक
- ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची निवड

आणि

- महिला टी-ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताची पाकिस्तानवर मात

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची रक्कम टप्प्याटप्प्याने वाढवणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथं काल मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. लाडकी बहिण ही योजना काही केल्या बंद होणार नाही, असा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी केला. ते म्हणाले:

> ***''पहिल्या दिवसापासून आम्ही सांगितलं, ही योजना बंद होणार नाही हा विश्वास याठिकाणी व्यक्त करतो. कारण याची सर्व पैशाची तरतूद आम्ही केलेली आहे. हे काम निवडणुका असू द्या नसू द्या आम्हाला तुम्हाला पैसे द्यायचे होते, कारण तुमच्या संसाराला हातभार लावायचा होता.''***

लाडकी बहिण योजनेतून सर्वाधिक महिला लाभार्थी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातले असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. या योजनेचे नोव्हेंबर महिन्याचे पैसे देखील महिलांच्या खात्यात जमा झाले असून, महिलांना लखपती करण्याचं सरकारचं उद्दीष्ट असल्याचं ते म्हणाले. अडीच वर्षामध्ये महाविकास आघाडी सरकारने केलेली कामं, आणि पुढच्या दोन वर्षात महायुती सरकारने केलेली कामं एकदा तपासून बघावी, असं सांगून त्यांनी विरोधकांवर टीका केली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे, खासदार भागवत कराड, पालकमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते.

याच कार्यक्रमात बळीराजा मोफत वीज योजनेचं मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं. राज्यातल्या ४४ लाख शेतकऱ्यांच्या साडेसात एचपी शेतीपंपांना मोफत वीज दिली जाणार आहे. या योजनेसाठी सरकारनं १४ हजार ७६१ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तसंच 'मागेल त्याला सौर कृषी पंप' ही महत्त्वाची योजना सरकारनं सुरू केली असल्याची माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली. मराठवाड्यातला दुष्काळ दूर करण्यासाठी पश्चिम वाहिन्या नद्यांचं पाणी मराठवाड्यात आणण्याच्या कामाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. पुढील काही वर्षात हे काम पूर्ण होणार असून, त्यानंतर मराठवाड्यातला दुष्काळ कायमचा दूर होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

रक्षाबंधनाच्या ओवाळणीनंतर आता बहिणींना भाऊबीजेची देखील ओवाळणी मिळणार असल्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं.

✻✻✻✻

या कार्यक्रमानंतर छत्रपती संभाजीनगर नजिक हर्सूल इथं महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशन संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय आभार मेळावा आणि मुख्यमंत्र्यांचा सत्कार समारंभ पार पडला. यावेळी बोलताना शिंदे यांनी, गावातल्या सर्व घटकांमध्ये समन्वय राखण्याचं काम पोलीस पाटील करत असतात, त्यांच्या सर्व मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून संवेदनशिलतेने निर्णय घेऊ, असं आश्वासन दिलं.

✻✻✻✻

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत काल अहिल्यानगर जिल्ह्यात अकोले इथं जनसन्मान यात्रा झाली. समाजातला कोणताही घटक विकासापासून वंचित राहणार नाही याची विशेष काळजी महायुती सरकारनं घेतली असल्याचं ते म्हणाले. यावेळी त्यांनी लाडकी बहीण योजनेतल्या लाभार्थी महिलांशी संवाद साधला.

****

बुलडाणा जिल्ह्यात खामगांव विधानसभा मतदारसंघातल्या दोन हजार ३६५ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल झालं. या योजनेच्या माध्यमातून शंभर टक्के अनुदानावर ड्रीपद्वारे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी उपलब्ध होईल, त्यामुळे या भागावरचा कोरडवाहूचा शिक्का पूर्णपणे पुसला जाईल, असं ते यावेळी म्हणाले.

****

चालू आर्थिक वर्षासाठी सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यात आले असून, त्यांची संख्या आणखी वाढवणार असल्याचं राज्य सरकारच्या वतीने सांगण्यात आलं आहे. केंद्र शासनाने या आर्थिक वर्षासाठी सोयाबीन करिता प्रति क्विंटल चार हजार ८९२ रुपये इतका हमीभाव घोषित केला आहे. आतापर्यंत सुमारे पाच हजार शेतकऱ्यांनी सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केली असून, जास्तीत जास्त शेतकर्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचं आवाहन राज्य शासनानं केलं आहे.

****

देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज नवी दिल्ली इथं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगणा, ओदिशा आणि मध्य प्रदेश या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह, या राज्यांना विकास निधी प्रदान करण्यात सक्रीय सहभाग असलेले पाच केंद्रीय मंत्री देखील या बैठकीला उपस्थित राहतील.

****

दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची निवड झाली आहे. साहित्य महामंडळाच्या काल पुण्यात झालेल्या बैठकीत भवाळकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. या बैठकीत संमेलनाच्या तारखा निश्चित करणं आणि कार्यक्रमांच्या रूपरेषेबाबतही चर्चा करण्यात आली.

लोकसाहित्याची स्त्रीवादी समीक्षा प्रस्थापित करण्यात डॉ. तारा भवाळकर यांची महत्वाची भूमिका राहिली आहे. ललित लेखन, अनुवाद, व्याख्याने, आकाशवाणीसाठी लेखन, यासह मराठी विश्वकोश, समाजविज्ञान कोश, मराठी वाङ्मयकोश, आणि  ग्रंथकोश यातल्या अनेक महत्त्वाच्या नोंदी त्यांनी लिहिल्या आहेत.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या:

***''अठ्ठ्याण्णवव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी, ज्या निवड समितीने माझी निवड केलीय, त्यांच्याबद्दल मी सुरवातीला कृतज्ञता व्यक्त करते. हा सन्मान हा केवळ माझा नाहीये. मी ज्या अभ्यास क्षेत्रामध्ये काम करत आलेय, त्या लोकसंस्कृती आणि नाटक विशेषतः आणि स्त्री विचार या सर्व प्रकारच्या विचारांचा आणि साहित्याचा सन्मान आहे.''***

****

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत काल छत्रपती संभाजीनगर इथून ८०० जेष्ठ नागरिकांना घेऊन जाणारी जिल्ह्यातली पहिली रेल्वे अयोध्येकडे रवाना झाली. पालकमंत्री अब्दुल सत्तार आणि गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर या यात्रेकरुंना निरोप देण्यात आला. जालना, नांदेड आणि बीड जिल्ह्यातूनही लवकरच प्रवासी रवाना होतील, अशी माहिती प्रशासनाच्या वतीनं यावेळी देण्यात आली.

****

लातूर शहरातल्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातल्या वसतिगृहात जेवणातून विषबाधा झालेल्या ६० विद्यार्थिनींची प्रकृती स्थिर असून, त्यांना काल रुग्णालयातून सुटी देण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला असून, अन्नाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर – घुगे यांनीही काल या विद्यार्थिनींची भेट घेतली. या वसतिगृहातल्या मेसचालकाचं कंत्राट रद्द करण्यात आलं आहे.

****

मुंबईत कांदिवली इथं 'नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या स्थापनेसाठी महाराष्ट्र सरकार आणि भारतीय क्रीडा प्राधिकरण यांच्यातल्या महत्त्वपूर्ण सामंजस्य करारावर काल स्वाक्षरी झाली. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत हे करार करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालचं सरकार जागतिक क्रीडा स्पर्धांमध्ये भारताची कामगिरी सुधारण्यासाठी कठोर परिश्रम करत असल्याचं गोयल यांनी सांगितलं. २०३६ साली होणारी ऑलिम्पिक स्पर्धा भारतातच होईल, तसंच त्या ऑलिम्पिकमध्ये नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रस्तावित सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये खेळाडूंकरता  अत्याधुनिक सुविधा पुरवण्यात येणार आहेत.

****

क्रिकेट

महिलांच्या टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल दुबई इथं झालेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा सहा खेळाडू राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत पाकिस्तानी महिला संघाने २० षटकात आठ बाद १०५ धावा केल्या. भारताकडून अरुंधती रेड्डीनं तीन, श्रेयांका पाटीलनं दोन, तर रेणुका सिंग, दीप्ती शर्मा आणि आशा शोभना यांनी प्रत्येकी एक खेळाडू बाद केला. प्रत्यूत्तरादाखल भारतीय महिलांनी १९ व्या षटकात चार खेळाडू गमावत हे लक्ष्य पूर्ण केलं. या स्पर्धेतला भारताचा पुढचा सामना येत्या बुधवारी नऊ तारखेला श्रीलंकेविरुद्ध होणार आहे.

****

पुरुष क्रिकेटमध्ये, तीन टी –ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतानं बांग्लादेशचा सात गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत बांग्लादेशचा संघ शेवटच्या षटकात १२७ धावांवर सर्वबाद झाला. अर्शदीप सिंह आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी तीन गडी बाद केले. भारताने केवळ ११ षटकं आणि पाच चेंडूत तीन गडी गमावत हे लक्ष्य साध्य केलं. अर्शदीप सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने एक – शून्य अशी आघाडी घेतल असून, मालिकेतला पुढचा सामना परवा बुधवारी दिल्लीत खेळला जाईल.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नऊ विधानसभा मतदारसंघात निवडणुका घेण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. निवडणूक कामासाठी २१ हजार ११५ अधिकारी,

कर्मचाऱ्यांची ऑनलाईन नोंदणी पूर्ण झाली आहे. विधानसभेसोबत नांदेड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक झाल्यास त्यासाठीही प्रशासकीय यंत्रणेने पूर्ण सज्जता ठेवली आहे. जिल्ह्यात ९ विधानसभा मतदारसंघासाठी ३ हजार ८८ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. जिल्हा निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी अधिकारी राजकुमार माने यांनी ही माहिती दिली.

****

हवामान

येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र तुरळक जागांवर पाऊस पडण्याची शक्यता असून कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तवली आहे.

****